# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ४३

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक ०९/०१/२०२६ सकाळी ११-३० वाजता आयुक्त तथा प्रशासक दालनात, आयुक्त तथा प्रशासक श्री नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्री नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ३. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ४. | श्री बाळासाहेब तट्टु | मुख्य लेखाअधिकारी |
| ५. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ६. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पाणीपुरवठा |
| ७. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य. अभियंता बांधकाम |
| ८. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. सह. आयुक्त तथा भांडारपाल |
| ९. | श्री प्रतिक कुंभार | लिपीक आस्थापना विभाग |
| १०. | श्री .एन के. बागुल | कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग |
| ११. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| १२. | श्री लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| १३. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-६८२ धुळे मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ याकरीता दोन दिवसासाठी ५५ एस.टी.बसेस पुरविणेकामी म.रा.प.मंडळ धुळे यांचेकडून दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक काही रिझर्व्ह गाडया ठेवाव्या. बऱ्यापैकी रुट मॅप, रुट प्लॅन फायनल झाला आहे. केंद्र फायनल झाले. आता जागेवर मोजमाप करुन बस कुठे उभ्या करायच्या, त्याचे सिक्वेन्स कसे ठेवायचे हे तुम्ही निश्चीत करुन घ्यावे. झोन करुन घ्यावे. साहित्य वाटपच्या दिवशी बसमुळे गोंधळ होता कामा नये. साहित्य घेणारे जे कर्मचारी येतील त्यांचे स्वत:चे खाजगी वाहन विशिष्ट अंतरावर उभे राहतील याबाबत दक्षता घ्यावी. त्याचे बॅरिकेटींग आधीच करुन घ्या. तेथे पोलिस उभे ठेवा. त्यादिवशी कोणतेही खाजगी वाहन मध्ये येणार नाही.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६० दिनांक ०९/०१/२०२६**

मा.राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांनी दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक कार्यक्रम २०२५-२६ जाहीर केला आहे.

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता मतदान क्रेद्रांवर कर्मचारी ने-आण करणेकामी महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ धुळे विभाग ५५ एस.टी बसेसची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने आपले कार्यालयास पत्र दिले असता पत्राव्दारे ०२ दिवसाचे दरपत्रक सादर करण्यात आलेले आहे.ते खालीलप्रमाणे

| **अ.क्रं** | **वाहनाचा प्रकार** | 24 **तासाचे भाडे दर** | **अनामत रक्कम** | **एकुण रक्कम** | **वाहनांची मुदत** | **वाहनांची संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **एस.टी. बस** | **१२८५०** | **२१५०** | **१५०००/-** | **२ दिवस** | **५५** |

उपरोक्त तक्त्यात नमूदनुसार एस.टी बसेसचे २४ तासांकरीता दर १२,८५० रु व अनामत रक्कम 2150 रु दर्शविण्यात आले आहे त्यानुसार एकुण रक्कम रु. १५००० मात्र × ५५ एसटी बसेस = एकुण रक्कम ८,२५,०००/- मात्र एका दिवसांकरीता खर्च होणार आहे. त्यानुसार २ दिवसांचा खर्च रु १६,५०,०००/- मात्र खर्च होणार आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तानुसार, धुळे मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ याकरीता दोन दिवसासाठी ५५ एस.टी.बसेस पुरविणेकामी म.रा.प.मंडळ धुळे यांचेकडून दरास मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६८३ धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ करीता कार व जीप प्रकारातील खाजगी वाहन भाडेतत्वावर पुरवणेकामी अधिकृत वाहन पुरवठाधारक नेमणे तसेच येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक याचे रेट कसे ठरवले.

मा.कार्य. अभियंता पर व्हेईकल रेट ठरवले आहे तसेच मंथील सुध्दा ठरवले आहे हे दर आरटीओ अॅप्रुव्हड दरापेक्षा कमी आहेत. आपण इंधनासह दर दिलेला आहे. यात जीएसटी समाविष्ट नाही. जीएसटी वेगळा राहिल.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६१ दिनांक ०९/०१/२०२६**

धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५चा कार्यक्रम जाहिर झालेला आहे. निवडणुक कार्यक्रमाचे काम करत असणारे अधिकारी व कर्मचारी यांना निवडणुकीचे कामकाज पार पाडणेकामी खाजगी वाहने भाडेतत्वावर पुरवठाधारकाकडून उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तरी निवडणूक कार्यक्रमांसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी खाजगी वाहन सेवा उपलब्ध करुन देणे हा सुध्दा निवडणूकीचा प्रमुख टप्पा आहे.

तसेच सदयस्थितीत म. आयुक्त सो, अति. आयुक्त सो, कार्यकारी अभियंता, वैद्यकिय आरोग्याधिकारी, मनपा धुळे असे एकुण ०४ अधिकारी वर्ग यांना म.न.पा.चे कार प्रकारातील वाहन उपलब्ध आहेत.

परंतु मनपा निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेनंतर अधिकारी व कर्मचारी यांना देखील निवडणूकीचे कामकाज पार पाडतांना वेळोवेळी वाहनांची आवश्यकता भासणार असून मनपाकडेस वाहने उपलब्ध नसल्याने खाजगी पुरवठाधारकांकडून वाहन उपलब्ध करुन घेणे आवश्यक असणार आहे.

उपरोक्त तक्त्यात नमुद नुसार अ.क्रं १ ते ५ वाहनांना कार स्विफट डिझायर चा अंदाजित खर्च ₹५८,३८०/- ×१५ ₹८,७५,७००/- एवढा येणार आहे व जीप प्रकारातील बोलेरो वाहनांचा खर्च ₹ ६८,२५०/- ×२० =

₹ १३,६५,०००/-एवढा येणार आहे. व तसेच ट्रॅक्स वाहनाचा खर्च रक्कम ₹ ६८,२५०/- ×१५ = ₹ १३,६५,०००/-एवढा येणार आहे. इनोव्हा वाहनाचा खर्च रक्कम ₹ ९३,४५०/- ×४ = ₹३,७३,८००/- एवढा व आयशर ट्रक खर्च रक्कम ₹ ₹ १,१४,४५०/- ×५ = ₹५,७२,२५०/- एवढा असे अंदाजित एकुण खर्च रक्कम ₹४५,५१,७५०/- अक्षरी -(पंचेचाळीस लक्ष एकावन्न हजार सातशे पन्नास रुपये) मात्र खर्च होणार आहे. --

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि./१०२५/२०२६ दि.१६/१२/२०२६ रोजी देशदूत / वार्ता या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२३/१२/२०२५ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाना रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहे.

याकामी श्री सुलाईमाता टूर्स अँण्ड ट्रॅव्हलस व गोविंद मधुकुमार ठाकरे (राम टूर्स अँण्ड ट्रॅव्हलस) यांचे निविदा दर प्राप्त झालेले आहे. सदर दरांचा तुलनात्मक तक्ता केला असता **श्री. सुलाई माता टूर्स अँण्ड ट्रॅव्हल्स** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराने आहे.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री. सुलाई माता टूर्स अँण्ड ट्रॅव्हल्स** यांचे दर न्यूनतम दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री. सुलाई माता टूर्स अँण्ड ट्रॅव्हल्स** यांचे प्रस्तावात नमूद A मधील 1 ते 5 व B मधील 1 ते 5 यासाठी आलेले निविदा दर मे स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ करीता कार व जीप प्रकारातील खाजगी वाहन भाडेतत्वावर पुरवणेकामी अधिकृत वाहन पुरवठाधारक **श्री. सुलाई माता टूर्स अँण्ड ट्रॅव्हल्स** यांचे प्रस्तावात नमूद A मधील 1 ते 5 व B मधील 1 ते 5 यासाठी आलेल्या निविदा दरास मान्यता

देणेत येत आहे. तसेच यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६८४ धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ चहापान व भोजन व्यवस्था करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक भोजन व्यवस्थेबाबत सुचना द्यायची की तक्रार येता कामा नये. नाही तयादवसाचे बिल अदा केले जाणार नाही. काल भोजनात अळी निघाली म्हणुन रु. ५०००/- दंड आकारण्यात यावा. दराबाबत वाटाघाटी केल्या आहेत का.

मा.प्र.भांडारपाल वाटाघाटी अंतीच हे दर सादर झाले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक रु. ९७/- मध्ये एक सुकी भाजी, पोळी लोणचे हे दर महाग आहे. यात एक गोड पदार्थाचा समावेश करावा. जेवण वाढतांना अडचण नको. त्यांच्याकडे गोपनीय लिफाफे असतात. तेलकट पदार्थ नसावे. मतमोजणीच्या दिवशी सकाळी चांगला नाष्टा असावा २-३ आयटम असावे.

मा.प्र. भांडारपाल त्या ठिकाणी स्टॉल असणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक जेथे आर ओ मतमोजणीसाठी वसतील तेथे आतमध्ये पाणी जाणार नाही त्याची व्यवस्था बाहेर कॉर्नरला असावी. तसेच खात्री करावी की जेवढे जेवण पुरविले ते फक्त व्हेरीफाय केलेले असावे.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६२ दिनांक ०९/०१/२०२६**

धुळे महानगरपालिका सार्वात्रिक निवडणुक २०२५ करीता आवश्यकतेनुसार चहापान भोजन व्यवस्था कामाकरीता धुळे मनपा प्रशासकीय महासभा प्रशासक ठराव क्र.१६७ दि.१४/७/२०२५ अन्वये उक्त कामाबाबात आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त विषयानुसार, विहीत पध्दीतीने निविदा दर मागविण्यात आले होते त्यानुसार अंतीम मुदतीत खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेली आहे त्यानुसार एकुण ४ निविदाधारकांनी सहभागी घेतलेला होता त्यामधुन ४ ही निविदाधारकांचे लिफाफा क्र. १ उघडण्यात आलेला असता त्यामधील कागदपत्रे तपासणी करुन खालील प्रमाणे पात्र/अपात्र चा तक्ता सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचे नावे | शेरा |
|---|---|---|
| १. | किरण केटरर्स | पात्र |
| २. | वत्सलाई भोजन | पात्र |
| ३. | हॉटेल कान्हा | पात्र |
| ४. | साईनंदन मंडप | अपात्र |

तसेच वरील ३ निविदाधारक हे पात्र असल्याने सदरचे त्यानंतर लिफाफा क्र. २ (Envelope II Commercial Bid) उघडण्यात आलेले असुन त्यांच्या दारांचा तुलनात्मक तक्ता (Item rate BOQ) प्रस्तावात सादर केला आहे.

भोजन व्यवस्था करणे कामी २ पुरठाधारक यांचे दर कमीचे असल्याने अनु.क्र.१ किरण केटरर्स यांचे एकुण १ ते ११ दर कमी आहेत व अनु.क्र.२ हॉटेल कान्हा यांचे १ ते ३ दर कमी आहेत तरी सदरचे काम निवडणुकीचे तात्काळ करणे गरजेचे असल्याने १ पुरवठाधारक निश्चित केल्यास सदरचे काम वेळेच्या आत व सुस्थितीत करता येईल. त्यानुसार मा. आयुक्त तथा मुख्या निवडणुक अधिकारी सो. यांचे समक्ष सुचने नुसार तक्त्यानुसार प्रमाणे दर निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ चहापान व भोजन व्यवस्था करणेकामी किरण केटरर्स यांचे प्रस्तावात नमूद अनु .क्र. १ ते १४ मध्ये आलेल्या आयटम रेट नुसार निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

उक्त व्यवस्थेत तक्रार येणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. तक्रार आल्यास संबंधित संस्थेस दंडात्मक कार्यवाही करावी. तसेच अ.क्र. ५ मध्ये दुपारच्या जेवणात गोड पदार्थ समाविष्ठ करावा. तसेच निविदेतील संपूर्ण व्यवस्थेबाबत दैनंदिन नोंदी घेण्यात याव्या. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६८५ धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ छपाई व्यवस्था करणेकामी आलेल्या आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.प्र.भांडारपाल छपाईबाबत निविदा मागविली होती. याचे दर जळगाव मनपाचे दर यात तुलना केली आहे. त्यांचे पेक्षा कमी दर आहेत. यात एकच निविदा आली होती. यात वाटाघाटीसुध्दा केली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात ४९ नंबरचा मुददा महाग वाटतोय यात रेग्युलर प्रमाणपत्र ज्या साईजचे असतात त्याच साईजमध्ये असावे. याचे दर ५० रुपये प्रमाणे करावे तसेच अनावश्यक खरेदी टाळावी. आलेल्या वस्तु प्रमाणीत झाल्यावरच देयके अदा केले जातील.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६३ दिनांक ०९/०१/२०२६**

धुळे महानगरपालिका सार्वात्रिक निवडणुक २०२५ करीता आवश्यकतेनुसार छपाई करणे कामाकरीता धुळे मनपा प्रशासकीय महासभा प्रशासक ठराव क्र.१६७ दि.१४/७/२०२५ अन्वये उक्त कामाबाबात आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे

उपरोक्त विषयानुसार, धुळे महानगरपालिके मार्फत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आलेले आहेत. या मध्ये एकुण २ निविदाधारकांनी सहभागी घेतलेला असुन तरी त्यामध्ये १ निविदाधारकांचा लिफाफा क्र. १ उघडण्या आलेला असता त्यामधील कागदपत्रे तपासणी करुन खालील प्रमाणे पात्र/अपात्र चा तक्ता सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचे नावे | शेरा |
|---|---|---|
| **१.** | आनंद एन्टरप्राईजेस | पात्र |
| **२.** | श्री विष्णु दिलीप प्रिंन्टींग | अपात्र |

तसेच वरील १ निविदाधारक हे पात्र असल्याने सदरचे सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ काम तातडीचे असल्याने लिफाफा क्र. २ (Envelope II Commercial Bid) उघडण्यात

आलेले असुन त्यांच्या दारांचा तुलनात्मक तक्ता (Item rate BOQ) प्रस्तावात सादर केला आहे.

छपाई करणे कामी १ **पुरवठाधारक आनंद एन्टरप्राइजेस** यांचे दर प्राप्त झाले आहेत सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ चे प्राप्त तुलनात्मक दरांशी तुलना केली असता नुसार तक्त्यानुसार प्रमाणे दर सादर करण्यात आलेले आहेत.सदर प्रस्ताव मान्यतेसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५ छपाई व्यवस्था करणेकामी **पुरवठाधारक आनंद एन्टरप्राइजेस** यांचे आयटम रेट नुसार प्रस्तावात नमूद अनु. क्र. १ ते ५१ मध्ये (अनु क्र. ४९ वगळून )आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे. यातील अनु क्र. ४९ वरील प्रमाणपत्र छपाई दर रु. १५० ऐवजी ५० रुपये निश्चीत करुन निविदा दरांस मान्यता देणेत येत आहे.

याबाबत आवश्यकतेप्रमाणे छपाई काम करण्यात यावे. व प्रत्येक बाबी तपासून नोंद घेण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६८६ धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ करीता स्टेशनरी साहित्य खरेदी कामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक — आलेली प्रत्येक वस्तु तपासुन घ्यावी. तसेच प्राप्त किती व वाटप किती याचा हिशोब झाला पाहिजे.

मा.प्र. भांडारपाल — याबाबत को ऑर्डीनेटरला पत्र देखील दिले आहे. प्राप्त साहित्यांची ओ सी घेवुन जे साहित्य उरेल त्यांना परत केले जाईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक — निवडणूक आयोगाचा नियम आहे की मनपाचा कुठलेही इलेक्शन झाले की २ महिन्याच्या आत सगळे देयक अदा करायचे व २ महिन्यात प्रमाणित करुन द्यायचे. आयोगाला की सगळे देयके अदा केले आहे. यात अनावश्यक होता कामा नये. बहुतांशी मतदान केंद्रांचे साहित्याचा पुर्नवापर करावा. सरसकट नविन टाकु नये. मडपाचे जे काम चालु आहे त्यांना आयटम रेटला मान्यता घ्यावी. अनावश्यक मंडप टाकु नये. झोनल ऑफिसर यांन फर्निचर बाबत पत्र द्यावे. त्यात चार्ट असावे, खुर्च्या, टेबल किती उपलब्ध होतील. वेबकास्टींग करावे. संवेदनशील केंद्राचे डिस्प्ले राहिल त्याची आर ओ ऑफिसेसला एक लिंक द्यावी. तसेच लॉगीन क्रेडेंशिअल जनरेट करायला सांगावे. याचे ॲक्सेस एस पी, डेप्युटी एस पी, ॲडशिनल एस पी, तसेच सर्व पोलिस निरीक्षक आपले महत्वाचे अधिकारी, आर ओ, ऑबर्झव्हर अशी यादी करुन वेब कास्टींग लॉगीन क्रेडेंशिअल द्यावे. तसेच जेवढे वाहने आवश्यक आहे त्यांना जीपीएस असावे. जेवढे दिवस वापरले जाईल तेवढया दिवसापर्यंत त्याचा रेट मेन्शन करावा. जे जीपीएस राहिल त्याचे लिंक महत्वाचे अधिकाऱ्यांना असाव्या. प्रोटेक्टेड लिंक असाव्या. ज्या दिवसापासुन जीपीएस लावले त्या दिवसापासुन डेली रिपोर्ट पाहिजे. रिपोर्ट नसेल तर बिल अदा केले जाणार नाही. इलेक्शन चा खर्च इलेक्शननंतर आला तर मी सही करुन स्थायी समोर मांडणार नाही.

मा. आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६४ दिनांक ०९/०१/२०२६**

धुळे महानगरपालिका सार्वात्रिक निवडणुक २०२५-२६ करीता कार्यालयीन कामाकाज व निवडणुक बुथ येथे स्टेशनरी साहित्य पुरविण्या करीता धुळे मनपा प्रशासकीय महासभा प्रशासक ठराव क्र.१६७ दि.१४/७/२०२५ अन्वये उक्त कामाबाबात आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे

उपरोक्त विषयानुसार, धुळे महानगरपालिके मार्फत विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात आले होते. प्रसिध्द करणेत आलेली होती.

या मध्ये एकुण २ निविदाधारकांनी सहभागी घेतलेला असुन तरी सदरचे काम हे सार्वत्रिक निवडणुक-२०२५-२६ चे कामी वेळे अभावी फेर निविदा करणेस पुरेसा वेळ नसल्याने सदरच्या दोन पैकी १ निविदधारक पात्र असल्याने सदरच्या निविदा उघडण्यास आलेले आहे त्यानुसार त्यामध्ये १ निविदाधारकांचा लिफाफा क्र. १ उघडण्या आलेला असता त्यामधील कागदपत्रे तपासणी करुन खालील प्रमाणे पात्र/अपात्र चा तक्ता सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचे नावे | शेरा |
|---|---|---|
| १. | आनंद एन्टरप्राईजेस | पात्र |
| २. | श्री विष्णु दिलीप प्रिंन्टींग | अपात्र |

तसेच वरील १ निविदाधारक आनंद एन्टरप्राईजेसहे पात्र असल्याने सदरचे सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ काम तातडीचे असल्याने लिफाफा क्र. २ (Envelope II Commercial Bid) उघडण्यात आलेले असुन त्यांच्या दारांचा तुलनात्मक तक्ता (Item rate BOQ) सोबत सादर केलेला आहे. तरी सदरचे दरांशी तुलना करण्यासाठी जळगाव महानरगपालिका निवडणुक २०२५-२६ व लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ चे प्राप्त दरांशी तुलना करुन सादर करण्यात आलेला आहे.

वरील प्रमाणे बाब निहाय तुलनात्मक तक्ता प्रस्तावात सादर करण्यात आलेला असुन नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम निविदाधारक हे भरण्यास तयार आहेत.त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे मनपा सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ साठी बुथ करीता स्टेशनरी साहित्य खरेदी अनु क्रमांक १ ते ३८ व ARO/RO स्टेशनरी साहित्य खरेदी करीता अनु क्रमांक १ ते ७४ यासाठी आनंद एन्टरप्राईजेस यांनी आयटम रेट नुसार सादर केलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

याबाबत आवश्यकतेप्रमाणे वस्तु व साहित्य घेण्यात यावे. व प्रत्येक बाबी तपासून नोंद घेण्यात यावी. प्राप्त व वाटप झालेले साहित्याची नोंद ठेवण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६८७ — आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत बहुउद्देशीय वाहन (Multi Utility Vehicle) खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्च व प्रत्यक्ष होणाऱ्या नोंदणी खर्च मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६५ दिनांक ०९/०१/२०२६**

आपत्ती व्यवस्थापन समितीच्या निर्देशानुरूप Multi Utility Vehicle खरेदी करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.आपत्ती व्यवस्थापन कार्यात सहभागी असणाऱ्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना रु.12 लक्ष पर्यंतचे वाहन खरेदी करता येईल असे नमूद आहे. त्या अनुषंगाने MG हेक्टर हे रु.11,99,000.00 किमतीचे वाहन (वस्तू व सेवा करा सहित) खरेदी करणे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. उपरोक्त किमतीत मोटार वाहन कर आणि नोंदणी शुल्काचा अंतर्भाव नाही. उपरोक्त वाहनास विमा रक्कम रु 59234.00 इतकी अतिरिक्त लागणार आहे. तसेच शासकीय नियमा प्रमाणे १% TCS कर रु. 11,990.00 अदा करावा लागणार आहे.

सदर वाहन सार्वजनिक वापराचे आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीचे असल्याने महाराष्ट्र मोटार व्हेईकल कर अधिनियम 1959 अन्वये कर सवलतीस पात्र असल्याने वाहन कर अदा करणे आवश्यक असणार नाही.

एकूण अभ्यास करता वाहन खरेदी करिता खालील प्रमाणे रकमा खर्ची पडतील

| | | |
|---|---|---|
| वाहनाची मूळ किंमत | = | रु.11,99,000.00 (GST सहित) |
| विम्याची रक्कम | = | रु.59,234.00 |
| १% TCS कर | = | रु.11,990.00 |
| इतर किरकोळ खर्च | = | रु.2368.00 |

------------------------------------------

एकूण रु. 12,72,592.00

विषयांकित वाहन खरेदी आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत आवश्यक असल्याने संदर्भ 5 अन्वये "आग सुरक्षा निधी अंतर्गत" साधन सामग्री आणि उपकरणे खरेदी शीर्षकाखाली खरेदी करणे प्रस्तावित आहे.

वरील प्रमाणे वाहन खरेदी करणेसाठी, येणाऱ्या रु.12,72,592.00 या रकमेच्या खर्चास आणि प्रत्यक्ष होणार्या नोंदणी खर्चास मे. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने उपरोक्त विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत बहुउद्देशीय वाहन (Multi Utility Vehicle) खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्च व प्रत्यक्ष होणाऱ्या नोंदणी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**